# महिला बचत गटाचे विविध पैलू



संपादक
डॉ. सुनिल शिंदे

महिला बचत गटाचे विविध पैलू

ISBN : 978-81-935535-7-2

© डॉ. सुनिल कृष्णराव शिंदे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

प्रकाशन
आकार पब्लिकेशन, महाल, नागपूर
मो.नं. ९८२२५६५७८२
ई-मेल : aakar100@gmail.com

मुखपृष्ठ
सी.डी. शिवणकर

अक्षर जुळवणी
स्कॅन डॉट कॉम्प्युटर, महाल, नागपूर

प्रथम आवृत्ती
एप्रिल २०१९

किंमत : २०० रु.

पत्ता :
डॉ. सुनिल कृष्णराव शिंदे
प्लॉट नं. ५१, धनवंतरीनगर, रमणा मारोती, नंदनवन, नागपूर
भ्रमणध्वनी क्र. ९४२१९९४९५१

या पुस्तकातील लेखातील विचार त्या त्या लेखकांचे असतात. यामध्ये संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका

१. महिलांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये
बचत गटाची भूमिका ................................ डॉ. सुनिल शिंदे ..................७
२. महिला सबलीकरण व स्वयंसहायता बचत गट .... प्रा. डॉ. राजू नत्थुजी ढबाले ... १९
३. बचतगट : स्त्री सक्षमीकरणाचं पहिलं पाऊल ...... डॉ. मंजूषा रा. ठाकरे .......... २३
४. ग्रामीण महिलांच्या सबलीकरणात बचत
गटाचे महत्व ........................................ डॉ. रमेश मो. बावणकुळे ...... २९
५. स्वयंसहाय्यता बचत गट व महिला
आर्थिक विकास ...................................... डॉ. गजानन रा. सोमकूंवर ..... ३४
६. महिला बचतगट चळवळ व उत्पादन विक्री तंत्र... डॉ. जयंतकुमार एम. मस्के .... ४१
७. महिला सबलीकरण आणि ग्रामीण वास्तव ......... प्रा. कल्पना निंबार्ते ............. ४४
८. स्त्रियांच्या सक्षमीकरणामध्ये स्वयंसहाय्यता
समूहाची भूमिका ................................... प्रा. मदन ग. प्रधान ............. ४९
९. महिला बचत गट व स्त्रियांची भुमिका ............ प्रा. आरती एम. देशमुख ....... ५५
१०. स्वयंसहायता बचत गट ग्रामीण
सक्षमीकरणाकरिता एक अनौपचारिक संस्था ...... प्रा. डॉ. सुरेंद्र पोथारे ........... ५८
११. स्वयंसहाय्यता बचत गटाची वाटचाल
व आव्हाने.......................................... प्रा. विठ्ठल एम घिनमिने ........ ६२
१२. बचत गट आणि महिला सक्षमीकरण .............. प्रा. गणेश नथ्थुजी बहादे ....... ६८
१३. ग्रामीण महिलांच्या आर्थिक विकासात
बचत गटांचे योगदान ............................... डॉ. श्रीकृष्ण बा. भुरे .......... ७३
१४. महिला सबलीकरण आणि शासकीय
उपाय-योजना ....................................... प्रा. मनोज कृष्णराव सरोदे .... ८१
१५. महिला सबलीकरण आणि दारिद्र्य.................. डॉ. जयश्री संजय सातोकर .... ८८

ISBN : 978-81-935535-7-2

# महिलांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये बचत गटाची भूमिका

**डॉ. सुनिल शिंदे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

● **प्रस्तावना**

स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या कल्याणासाठी अनेक योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. परंतु गेल्या काही वर्षात विशेषतः जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत राजकीय व सनदी नोकरशाहीला हाताशी धरून गरीबी हटविण्याच्या ऐवजी Poverty Reducation च्या नावाखाली तसेच नवीन रोजगार निर्माण करण्याच्या नावाखाली संपूर्ण गरीब समाजालाच वेठीस धरले आहे. ह्या संपूर्ण प्रक्रियेत शोषणाचा बळी ठरलेला एक घटक म्हणजे स्त्रिया होत. जागतिकीकरणाच्या वैशिष्ट्यांचा आणि परिस्थितीचा प्रभाव सर्वव्यापक असला तरीही त्याचा सर्वात जास्त फटका हा स्त्रियांना सहन करावा लागत आहे. याबरोबरच वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरा, रूढी, चालीरीती यांच्या बंधनात अडकून राहिल्याने महिलांची स्थिती विशेषतः ग्रामीण भागातील महिलांची स्थिती अधिकच खालावत चालली आहे. असंघटितपणा, शिक्षणाचा अभाव, रोजगार आणि आरोग्य यांचा अभाव, अंधश्रध्दांचा जबरदस्त पगडा यामुळे ग्रामीण दारिद्र्यात भरच पडत आहे व याचा सर्वात जास्त परिणाम ग्रामीण महिलांवर होत आहे. भारतातील सामाजिक चालीरीती, रूढी व परंपरामुळे ग्रामीण महिलांना विकासामध्ये महत्व दिले गेले नाही. आणि त्यांना विकासाची संधी सुध्दा मिळाली नाही. परंतु वास्तविकता ही आहे की, जोपर्यंत ग्रामीण महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले जात नाही तोपर्यंत भारताच्या आर्थिक महासत्तेची कल्पना करणे योग्य होणार नाही. ह्याकरीता महिला बचत गट महिलांच्या आर्थिक विकासाकरीता प्रभावी माध्यम म्हणून समोर येत आहे. बचत गटातील महिला कुटूंबाला दारिद्र्याच्या गर्तेतून बाहेर काढून आर्थिकदृट्या सक्षम होऊन स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करीत आहेत.

● **संशोधन विषयाचे उद्देश**

१. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी बचत गटाच्या योगदानाची माहिती

ISBN : 978-81-935535-7-2

घेणे.
२. बचत गटातील महिलांच्या व्यक्तिमत्व विकासाचा शोध घेणे.
३. भिवापूर तालुक्यातील महिला बचत गटाद्वारे चालविल्या जाणाऱ्या व्यवसायाची माहिती घेणे.

**● संशोधन विषयाची गृहिते**

१. बचत गटामुळे महिला आर्थिकदृट्या स्वावलंबी होत आहेत.
२. महिला बचत गटाच्या स्थापनेमुळे महिलांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होत आहे.

**● संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यासाठी प्राथमिक आणि द्वितीयक सामग्री संग्रहनाच्या पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. ह्यामध्ये भिवापूर तालुक्यातील यशस्वी महिला बचत गटांना प्रत्यक्ष भेट देऊन महिलांचे स्वावलंबन आणि व्यक्तिमत्व विकासासदर्भांत माहिती प्राप्त करण्यात आलेली आहे. द्वितीयक सामग्री संग्रहन पध्दतीमध्ये वर्तमानपत्रे, मासिके, प्रकाशित पुस्तके इ. चा आधार घेण्यात आला आहे.

**● बचत गटाची पार्श्वभूमी**

बचत गटाच्या संकल्पनेचे खरे श्रेय मिळते ते बांगलादेशालाच, महिलांच्या बचत गटांची सुरुवातच बांगलादेशातून प्रथम झाली. तेथील ग्रामीण बँकेने गरिबांच्या जीवनात अक्षरशः क्रांती घडवून आणली. या देशानेच बचत गटाची संकल्पना सांगितली, शिकविली आणि ग्रामीण बँकेच्या माध्यमातून आपल्यासमोर एक आदर्श निर्माण केला. बांगलादेशातील या चळवळीपासून प्रेरणा घेवूनच भारतात बचत गटाची चळवळ उभी राहीली. बांगलादेशात १९७० पर्यंत बचत गट किंवा सुक्ष्म वित्त हे शब्दही अस्तित्वात नव्हते. पण नंतर हे दोन शब्द बांगलादेशवासियांच्या परवलीचे झाले. बांगलादेशातील चित्तगाव विद्यापिठात मोहम्मद युनूस हे अर्थशास्त्र विभाग प्रमुख या संकल्पनेचे खरे प्रणेते आहेत. त्यांच्या कार्याची जागतिक स्तरावर दखल घेवून त्यांना अत्यंत प्रतिठेच्या नोबेल पुरस्काराने सन्मानित केले. त्यांनी 'थेंब थेंब तळे साचे' या म्हणीप्रमाणे बांगलादेशातील गरीब कुटूंबातील महिलांना बचत गटाच्या माध्यमातून एकत्र आणून पैसे बचत करण्यास प्रोत्साहीत केले. आणि ग्रामिण बॅकेच्या माध्यमातून त्या देशातील गरिबी दुर करण्याचा यशस्वी प्रयोग केला त्याची दखल संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक बँक, इटरनॅशनल फूड रिसर्च पॉलिसी इन्स्टिट्युट यांसारख्या


ISBN : 978-81-935535-7-2

जागतिक संस्थांनीही घेतली आहे. त्यांनी महिलांसाठी केलेल्या कार्यामुळे महिलांमध्ये आर्थिक उन्नतीसोबतच सकारात्मक बदल घडून आला.त्यांना एक नवी दिशा मिळाली. स्वयंरोजगाराच्या माध्यमातून त्या खऱ्या अर्थाने उभ्या राहील्या. बांगला देशात आता ग्रामीण बँकेचे ४० लाख सदस्य आहेत. यामध्ये ९६ टक्के महिला या बँकेच्या मालक आहेत. त्या महिला बँकेच्या भागधारक असून ९० टक्के भाग त्यांच्याच मालकीचे आहेत आणि उर्वरित १० टक्के भाग बांगलादेश सरकारच्या मालकीचे आहेत. आज असे ठामपणे म्हटले जाते की, बांगला देशातील खेड्यांचे संपूर्ण चित्र ग्रामीण बँकेने बदलले. मायक्रो फायनान्सने गरीब लोकांना प्रगतीची संधी दिली. म्हणूनच हे मॉडेल जगभरात प्रसिध्द झाले.

**● भारतातील बचत गटाचे स्वरूप**

भारतामध्ये १९९० च्या दशकात बचत गटाची चळवळ धोरणात्मकरित्या स्विकारून त्या संदर्भात प्रभावी अंमलबजावणी सुरू झाली त्यामुळेच भारतात स्वयंसहायता बचत गटांच्या चळवळीने क्रांतीकारक स्वरूप धारण केले. निम्न मध्यमवर्गीय आणि गरीब महिलांच्या आर्थिक उन्नतीच्या दृटीने बचत गटाची चळवळ यशस्वी होत असतांना दिसते. या बचत गटामुळे महिलांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली, बचत गट हे नाव सार्थ झाले. पण त्याही पलीकडे जाऊन या गटांनी कार्य करायला सुरुवात केली. अक्षरशः ग्रामविकासापासून यशस्वी उद्योजक, अशी बऱ्याच बचत गटांनी मजल मारली. म्हणून या गटांना बचत गटाऐवजी "स्वयंसहायता गट" हे नाव पडले. बचत गटातील महिला एकत्र येवून स्वतःची मदत स्वतःच करतात, तसेच त्या इतरांना मदत करण्याइतपतही सक्षम होतात. म्हणूनच त्यांच्या गटाला स्वयंसहायता बचत गट म्हणून आता ओळखले जाते. गावागावांत जाऊन बचत गटांविषयी माहिती देणारे बँकेचे अधिकारी असोत, वा वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनीधी असोत, ते गावात जाऊन महिलांची बैठक घेतात, बचत गट म्हणजे काय समजावून सांगतात. बचतीचे महत्व समजावून सांगतात. अर्थातच अल्प रक्कम दर महिण्याला बचत करायची असल्याने लाखो बचत गट भारतात स्थापन झालेले आहेत. त्यापैकी अंदाजे ९० टक्के बचत गट यशस्वीही झालेले आहेत. बचत गटाची चळवळ ग्रामीण भागात आणि शहराच्या गरीब वस्त्यांमधूनही चांगली फोफावली आहे. त्यामुळे महिलांचा आर्थिक विकास तर होतोच पण त्यांच्यामध्ये सकारात्मक मानसिकता तयार होण्यासही मदत होत आहे.

भारताच्या ग्रामीण भागातील खेड्यांमध्ये गेल्या दहा वर्षात २ लाखावर

बचत गटाची स्थापना झाली. त्यामध्ये महिला बचतगटाची संख्या १ लाख ६१ हजार ८७२ आहे. यापैकी ४३ हजार २५४ महिला बचतगटांनी आर्थिक उपक्रम सुरू केले आहेत. महिला बचतगटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांच्या सबलीकरणाला मोठी गती मिळाली आहे. ग्रामीण भागातील सावकारांचे कंबरडे मोडण्याचे काम बचतगटाच्या माध्यमातून होत आहे. महिला बचतगटांना ४ टक्के व्याजदराने व्यवसायाकरीता कर्ज दिले जात आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर महिला बचत गटाद्वारे चालविले जाणारे व्यवसाय उभे राहिले आहे.

- **महाराष्ट्रातील बचत गटाची वाटचाल**

भारतामध्ये महाराष्ट्राने बचत गटाच्या स्थापनेमध्ये पुढाकार घेतलेला दिसून येतो. महाराष्ट्रामध्ये बचत गटाच्या स्थापनेमध्ये राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड), महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादित (माविम) महानगरपालिका तसेच नगरपालिका क्षेत्रातील दारिद्र्य रेषेखालील तसेच मागासवर्गीय महिलांसाठी नगर परिषद प्रशासन संचालनालय, राष्ट्रीयकृत, शेड्युल व सहकारी बँका तसेच स्वयंसेवी संस्था इत्यादींचा समावेश होतो.

महाराष्ट्रामध्ये सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या माध्यमातून निर्माण झालेल्या बचत गटाची माहिती पुढील तक्त्यात दिलेली आहे.

| जिल्हा | बचत गट संख्या | महिला बचत गट | व्यवसाय सुरू केलेले बचत गट गट | एकूण महिला महिला गट |
|---|---|---|---|---|
| ठाणे | ५५४९ | ४५४५ | १६६६ | १०७९ |
| रायगड | ४५०६ | ३९४८ | ७६४ | ५५४ |
| रत्नागीरी | ५१६९ | ३३०२ | ३७५६ | ३६२ |
| सिंधुदुर्ग | ३४८१ | १९३२ | ५१८ | ३१७ |
| नाशिक | ४८०३ | ३०१८ | १३५२ | ८५० |
| धुळे | २६३२ | १८६८ | २८१७ | ७५५ |
| नंदुरबार | ३३०१ | २८२१ | २५३१ | ५५० |
| जळगाव | ६५६३ | ४४४८ | २१३७ | १६३७ |
| अहमदनगर | ४७१८ | २६५२ | ३२०२ | ८५८ |
| पुणे | ७३०४ | ५५११ | ४४३४ | ८७२ |
| सातारा | ४४२१ | ३४४३ | २७१० | ७४३ |
| सांगली | ३६८५ | ३५४७ | २००९ | ६८० |


ISBN : 978-81-935535-7-2

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सोलापूर | ८६४४ | ७२४४ | ५२४८ | १४१३ |
| कोल्हापूर | ६५६९ | ५३८० | ३१७२ | ८८९ |
| औरंगाबाद | ४२६७ | ३०८० | ७५६ | ६३३ |
| जालना | २९४५ | २१३४ | ५८५ | ४४ |
| परभणी | २४४७ | १९६६ | ४७६ | ४७६ |
| हिंगोली | २५५८ | १५९४ | १७०१ | ४१३ |
| बीड | ३६०१ | २५१२ | १३८० | ४४३ |
| नांदेड | ४८८५ | ४४०९ | १०११ | ७८८ |
| उस्मानाबाद | ३४४० | २७६९ | २२९८ | ४५१ |
| लातूर | ४००६ | ३६६९ | ३०१४ | ८१७ |
| बुलढाणा | ६६८३ | ३०५१ | ४८१२ | ५४४ |
| अकोला | ५४७६ | ४३११ | ११०७ | ७९५ |
| वाशिम | २९३३ | २१४७ | २१८८ | ६४९ |
| अमरावती | ८५१२ | ६९९७ | ६२९० | १४३१ |
| यवतमाळ | ६४६८ | २८६० | ३२३२ | १५५५ |
| वर्धा | ३४७२ | २७६९ | ९५५ | ६०० |
| नागपूर | ४२२५ | २६३८ | ८६५ | ६६९ |
| भंडारा | ४३८५ | ३८५६ | २२७२ | ७९५ |
| गोंदिया | ५७५५ | ४५२१ | ४४७० | ९०७ |
| चंद्रपूर | ३०६७ | ३२३६ | १२२९ | ११७१ |
| गडचिरोली | ३३५९ | ३०८९ | २८३१ | ८०८ |
| एकूण | १५५८९३ | ११५११७ | ७७७८८ | २५९५८ |

स्त्रोत:- लोकराज्य मासिक

● चिमूर तालुक्यातील बचतगटाचे व्यवसाय

चिमूर तालुक्यामध्ये बचत गटाच्या बाबतीत पुर्ण जागरूकता निर्माण झालेली दिसून येते. दिवसेंदिवस नवनवीन बचत गट निर्माण होत असून या तालुक्यात आता बचत गटांनी चळवळीचे स्वरूप धारण केलेले आहे. तालुक्यामध्ये पुरुष आणि महिलांचे हजारो बचत गट स्थापन झालेले आहे. बचत गटाच्या व्यवस्थापन बाबतीत पुरुषांपेक्षा महिला बऱ्याच पुढे आहेत. महिलांचे बचत गट केवळ कागदावरच दिसून येत नाही तर प्रत्येक महिला बचत गट कोणता ना

कोणत्या तरी व्यवसाय करण्याच्या जिद्दीने उभा राहिलेला आहे. त्यामुळे या तालुक्यात महिला बचत गटाद्वारे चालविल्या जाणाऱ्या बचत गटाच्या व्यवसायाचे जाळे संपूर्ण तालुक्यामध्ये पसरलेले आहे. भिवापूर तालुक्यामध्ये शेती हा लोकांच्या उपजिवीकेचा मुख्य व्यवसाय आहे. त्यामुळे अनेक महिला बचत गटांनी शेती आणि शेतीसोबतच शेतमाल खरेदी विक्रीला प्राधान्य दिलेले आहे. ह्यामध्ये मिरची, सोयाबिन, धान, हळद इत्यादी शेतमाल प्रमुख आहे. त्याचप्रमाणे शेतीला जोड व्यवसाय म्हणून मदतगार ठरणाऱ्या आणि कमी भांडवलामध्ये सुरू होवू शकणाऱ्या दुग्ध व्यवसाय, बकरी पालन, कुक्कुटपालन, मळणी यंत्र, कृषी सेवा केंद्र इत्यादी व्यवसाय महिला बचत गटाद्वारे सुरू आहेत. अनेक महिला बचत गट कांडप केंद्राच्या माध्यमातून मिरची आणि हळद या शेती उत्पादनावर प्रक्रिया करून मिरची आणि हळद पावडर विक्रीचा व्यवसाय करीत आहेत. काही महिला बचत गट दररोजच्या ग्रामीण जीवनाशी संबंधित किराणा व जनरल, भाजीपाला, स्टेशनरी, मंडप डेकोरेशन व बिछायत, शिवणकाम, कापड दुकान , अंगणवाडीसाठी आहार शिजविने इत्यादी व्यवसाय करीत आहेत. तर काही महिला बचत गट धार्मिक उत्सवाप्रसंगी पुजेचे साहित्य, राखी विक्री इत्यादी हंगामी स्वरूपाचे व्यवसाय करीत आहेत.

बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या व्यक्तिमत्व विकासात साध्य झालेल्या बाबी

● **महिलांमध्ये एकी व संघटन निर्माण झाले**

बचत गटाचा सर्वात महत्वाचा फायदा म्हणजे विविध जातीच्या, धर्माच्या व गरजू महिलांना एकत्र आणण्याचे काम बचतगटानी केलेले आहे. एकमेकींच्या अडीअडचणी समजून, एक दुसरीच्या निकडीचा, सुख दुःखाचा विचार करण्यासाठी १० ते १५ समविचारी महिलांनी एकत्रित येऊन बचत गटाची स्थापना केलेली आहे. बचत गटातील महिला समविचारी असल्यामुळे आपापसात विचारांची देवाण घेवाण करतात. ह्यातून महिलांचे संघटन तयार होते. आजच्या जागतिक लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकसंख्या महिलांची आहे. जगातील एकूण समाजापैकी अर्धा वर्ग महिलांचा असला तरी त्यांना आज स्वतःच्या मनाप्रमाणे, मताप्रमाणे, विचाराप्रमाणे जगण्याचा अधिकार नाही. पुरूषाइतकेच श्रम करीत असूनही त्याचा योग्य मोबदला मिळत नाही. अशाप्रकारे एक माणूस म्हणून जगण्याचा अधिकार महिलांना मिळावा ह्यासाठीही महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून महिलांमध्ये संघटन शक्ती निर्माण करून संघटन शक्तीच्या बळावर स्वयंरोजगाराच्या


ISBN : 978-81-935535-7-2

दिशेने वाटचाल सुरू केली आहे.

● **महिलांना बचतीची सवय लागली.**

समाजातील विविध स्तरातील महिला एकत्र येऊन परस्परांशी सुख दुःखाची देवाण घेवाण करतात. आजची बचत उद्याच्या कामाला येते ही भावना त्यांच्यात निर्माण झाली. बचतीची एक चांगली सवय लागल्यामुळे भविष्यातील विविध बाबींचे नियोजनात अडचण येत नाही. महिलांना एक दुसरीला आर्थिक तसेच अडचणीच्या वेळी मदत करण्याची एक चांगली सवय लागली. महिलांना आपल्या दैनंदिन अडचणी सोडविणे सहज शक्य झाल्या. स्वतःची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरीता बीज भांडवल तयार करणे महिलांना शक्य झाले.

● **महिलांचे आर्थिक स्वावलंबन**

देश स्वतंत्र झाल्यापासुन महिला आर्थिक स्वावलंबनाच्या अनेक योजना आल्या व गेल्या पण निष्पन्न काहीच झाले नाही. महिला बचत गट योजनेमुळे एक वेगळे चित्र ग्रामीण भागात निर्माण झाले. महिलामध्ये संघटन शक्ती उभी राहिली. नेतृत्वगुणांचा विकास झाला. सहकार प्रेमभावना उभी राहिली. आणि आता तर बचतगटातील महिला सामूहिक तथा वैयक्तिक, बॅकेच्या आर्थिक सहकार्याने शेतीसोबतच लघुउद्योग उभारून स्वावलंबी झालेल्या दिसतात. त्यामुळे गरीब गरजू लोकांची विकास प्रक्रियेतील गती अधिक गतिमान झालेली दिसते. आर्थिक स्वावलंबित्वामुळे महिलांना स्वतंत्र निर्णय घेण्यासाठी बळ मिळाले.

● **महिलांना शिकण्याची संधी मिळाली.**

महिलांचे जिवन जगणे म्हणजे केवळ चुल व मुल एवढ्यापुरतेच मर्यादीत नाही तर त्याही पलीकडे जगणे आहे ही भावना महिंलामध्ये निर्माण झाली. समाजासाठी देशासाठी कार्य करण्याची बचत गटामुळे महिलांना संधी मिळाली. आपल्या अंगच्या कला कौशल्य या गुणामुळे जीवन उपयुक्त करण्याची योग्य संधी मिळाली. संघटीतपणातून नवीन शिकण्याची संधी मिळाली. बँकेचे व्यवहार समजले. पोटाचे व्यवहार माहिती झाले. महिलांच्या व्यवहार ज्ञानात भर पडली. महिलांचा व त्यासोबत आपल्या परिवाराचाही सर्वांगीण विकास करून घेण्याची संधी या बचत गटाच्या निमित्याने महिलांना प्राप्त झाली.

● **बचत गटामुळे महिलांमध्ये निर्णय घेण्याची क्षमता आली.**

महिलांना या बचत गटामुळे व त्यातील सक्रीय सहभागामुळे जीवनात येणाऱ्या विविध प्रश्न व समस्यांना विश्वासाने सामोरे जाण्याचे धाडस प्राप्त झाले. स्वतःच्या व समाजाच्या जीवनात अस्तित्वात असणाऱ्या अनेक लहान सहान

प्रश्नांची जाणीव झाली व त्यावर उपाययोजना करण्याकरीता विचार प्रणालीने आकार घेतला. आत्मविश्वास आणि आत्मबळ मिळाले. निर्णयप्रक्रियेच्या सहभागामुळे महिलांना संधी मिळाली असून, स्वतःचे घर सांभाळून सामाजिक विषयावर आवाज उठविण्याची ताकद मिळाली. आपणही योग्य निर्णय घेऊ शकतो ही दृष्टी मिळाली. बचत गटातील महिलांना कोणताही निर्णय घेतांना कोणावरही विसंबून राहावे लागत नाही. महिलांचा दृष्टीकोण मी पासून आम्हीपर्यंत विस्तारित होवू लागला. पर्यायाने स्वयंविकासाकडून सामाजिक विकासाकडे वाटचाल होवू लागली.

**● महिलांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावल्या**

बचत गटामध्ये येण्यापूर्वी महिलांचे घराबाहेरचे ज्ञान अत्यंत मर्यादित होते. केवळ चुल आणि मुल हेच महिलांचे कार्यक्षेत्र होते. घराच्या चार भिंतीच्या बाहेर काय सुरू आहे. याची महिलांना माहिती नव्हती. बचत गटात येण्यापूर्वी महिलांना घराच्या बाहेर पडून ज्ञान अर्जित करण्याची साधी हिंमत सुध्दा महिलांमध्ये नव्हती. पुरूषप्रधान संस्कृतीमध्येच महिला अडकलेल्या होत्या. परंतु बचत गटात आल्यापासून महिलांचा स्वतःकडेच पाहण्याचा दृष्टीकोण संपूर्ण बदललेला आहे. आता त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची तळमळ निर्माण झालेली आहे. महिला बचत गटाच्या माध्यमातून विविध व्यवसाय, छोटे मोठे उद्योग यांचे ज्ञान प्राप्त करीत आहेत. अनेक महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून स्वतःचे छोटे मोठे उद्योग सुरू केले आहेत. उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान त्यांनी महिला बचत गटांना उपलब्ध करून दिलेल्या प्रशिक्षण शिबीरामधून प्राप्त केले आहे. बचत गटामध्ये येण्यापूर्वी अनेक महिला निरक्षर होत्या. आता मात्र त्यांना स्वतःच्या न शिकल्याची लाज वाटते. अनेक महिला बचत गटात आल्यापासून निरक्षरतेच्या गर्तेतून बाहेर पडल्या आहेत. मुलाबाळांना शिक्षित केले पाहिजे ही भावना महिलांमध्ये निर्माण झाली आहे.

**● महिलांना बँकेचे व्यवहार माहीत झाले.**

बचत गटात येण्यापूर्वी अनेक महिलांना बँक म्हणजे माहित नव्हते. तर अनेक महिलांचा बँकेशी साधा संपर्कसुध्दा आलेला नव्हता. त्यामुळे महिलांनी कितीही पैसा कमावला तरी तो बचत केला पाहिजे, अशी भावना महिलांमध्ये नव्हती. आलेली संपूर्ण कमाई ते घरामध्येच खर्च करीत असत. बँकाद्वारे अनेक प्रकारचे फायदे मिळतात याची माहितीही महिलांना नव्हती. बँकेच्या महिला विकासाकरिता असलेल्या असंख्य योजना, सवलती यापासून महिला कोसो दुर

 ISBN : 978-81-935535-7-2

होत्या परंतु महिला बचत गटात आल्यापासून महिलांचा बँकेसोबत संबंध आला त्यामुळे बँकेत खाते काढणे, बँक खात्यामध्ये पैसे जमा करणे. बँकेतून पैसे काढणे. बँकेच्या बचत गटासाठी व महिला विकासाकरिता असलेल्या योजना बँक अधिकाऱ्यांकडून जाणून घेणे. बँकेकडून कर्जावर मिळणाऱ्या अनुदानाची माहिती अशा अनेक बँकेच्या व्यवहाराची माहिती महिलांना बचत गटामध्ये आल्यामुळे माहिती झाल्या.

- **महिलांच्या व्यवहार ज्ञानात वाढ झाली.**

बचत गटात येण्यापूर्वी महिलांचे कार्य केवळ चार भिंतीच्या आतच असायचे. कुटूंबातील सर्व व्यवहार पुरूषांच्या हाती होते. महिलासुध्दा ह्यामध्ये हस्तक्षेप करीत नव्हत्या. महिलांना कोणतीही आर्थिक गरज पडलल्यास ती घरच्या कर्त्या व्यक्तिकडूनच पूर्ण करावी लागत होती. महिला बचत गटामध्ये येण्याअगोदर अनेक महिलांचे व्यावहारीक ज्ञान शुन्य होते. परंतु महिला बचत गटामध्ये आल्यानंतर अनेक महिला स्वतःचा व्यवसाय करू लागल्या आहेत. व्यवहारातील लहान सहान ज्ञान महिलांनी प्राप्त केले आहे. महिला बचत गटामध्ये येण्यापूर्वी ज्याप्रमाणे महिलांची फसवणूक केली जात होती ती फसवणूक मात्र महिलांना आलेल्या व्यवहार ज्ञानामुळे कमी झाली आहे.

- **महिलांना लहान प्रमाणावरील आर्थिक अडचणी दुर करता आल्या**

महिला बचत गट हे महिलांच्या लहान सहान आर्थिक अडचणी पूर्ण करण्याचे महत्वाचे माध्यम म्हणून पुढे येत आहे. आज भारताच्या ग्रामीण भागामध्येच नाही तर शहरी भागामध्येसुध्दा मोलमजूरी करणाऱ्या महिलांनी एकत्र येवून महिलांचे अनेक गट स्थापन केलेले आहे. त्यामुळे महिलांना बचत गटामध्ये लहान प्रमाणातसुध्दा बचत करणे शक्य झाले आहे व बचत केलेली रक्कम पाहिजे तेव्हा प्राप्त करता येत असल्यामुळे महिलांचा बचत गट स्थापन करण्याकडे कल वाढलेला आहे. बचत गटामुळे महिलांना आपल्या दैनंदिन अडचणी सोडविणे शक्य झाले आहे. महिला बचत गटामुळे महिलांना आर्थिक गरज पूर्ण करण्यासाठी इतरांवर अवलंबून राहण्याची गरज राहिली नाही.

- **बचत गटामुळे महिलामध्ये उद्योग क्षमता विकसित झाली**

बचत गटामध्ये सहभागी झाल्याने महिलामधील सुप्त गुणांना वाव मिळून त्या अनुषंगाने काम करण्याची संधी प्राप्त होते. यामुळेच उद्योगक्षमता विकसित करण्याची संधी प्राप्त झाली. महिला बचत गटांच्या सदस्यांनी जमा केलेल्या बचतीतून उद्योग व्यवसाय सुरू करण्यापर्यंतची गटाची यशोगाथा बचत गटांनी

निर्माण केली आहे. शिवापूर तालुक्यासाठी अनेक महिला बचत गट, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सहयोगिनींमार्फत काम करीत असून, [illegible] समन्वयिका सौ. रंजना वाघमारे यांनी या तालुक्याचे [illegible] बचत गटांची स्थापना केली. [illegible] तसेच सामाजिक प्रक्रिया [illegible] म्हणून गावामध्ये बचत गटांची स्थापना करण्यास सुरुवात झाली. बचत गट स्थापन केल्यानंतर नियमानुसार बचत गटामध्ये नियमित बचत करणे सुरू झाले. माविमतर्फे प्रशिक्षण मिळत गेले. महिला बँकेत व [illegible] जावून स्वतःचे काम करू लागल्या. काम करता करता आत्मविश्वास निर्माण झाले. गटामध्ये सहभागी महिलांमध्ये अनेक महिला केवळ शिक्षित तर अनेक निरक्षर होत्या. निरक्षर असल्याने त्यांना व्यवहारात अडचणी यायच्या या महिलांना साक्षर करण्याची जबाबदारी इतर शिक्षित महिलांनी घेतली आणि काही काळानंतर निरक्षर महिलाही साक्षर झाल्या. बचत गटामधील बचत केलेल्या पैसातून अंतर्गत व्यवहार सुरू झाले. केवळ अंतर्गत कर्जावर या महिलांनी समाधान मानले नाही. तर आपण स्वतःचा उद्योग केला पाहिजे असा विचार पुढे आला. सर्वप्रथम त्यांनी माविमतर्फे उद्योग कसे करावेत याची माहिती प्रशिक्षणाद्वारे जाणून घेतली. त्यानंतर त्यांनी आपला स्वतःचा व्यवसाय गावामध्ये सुरू केला. त्यासाठी त्यांनी बँकेतर्फे स्वर्णजयंती योजनेतून कर्ज घेतले. महिलांनी सुरू केलेल्या व्यवसायाला सुरुवातीला गावातील महिलांनी प्रतिसाद दिला. नंतर हळूहळू गावातील पुरुष मंडळीही महिला बचत गटाच्या उपक्रमाला प्रतिसाद देत गेले. 'केल्याने होत आहेरे आधी केलेच पाहिजे' या उक्तीचा प्रत्यय महिलांना आला. त्यांची आर्थिक प्रगती साधली गेली व उद्योगासाठी आवश्यक असलेली उद्योग क्षमता महिलांमध्ये विकसित झाली.

**● बचत गट महिलांच्या सर्वांगीण विकासाचे उत्तम माध्यम**

बचत गट म्हणजे महिलांसाठी एक वरदान होय. बचत गटामुळे केवळ आर्थिक विकासाचे मार्ग व संधी उपलब्ध होते असे नाही तर विविध प्रशिक्षण, बाहेरील जगाचा अनुभव, संघटन कार्याचा व विचारांचा प्रभाव यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वासाची निर्मिती होते. तसेच घरात बँकेत आणि पर्यायाने गावात महिलांची पत व सामाजिक दर्जा निर्माण होतो. बचत गट हे स्वावलंबनाचे, मानसिक व वैचारीक, आर्थिक उन्नतीचे आणि सामाजिक प्रगतीचे उत्तम माध्यम आहे. बचत गटामुळे महिलांची गतिशिलता वाढते व स्वतःच्या


ISBN : 978-81-[illegible]

आत्मविश्वासही वाढतो. शासकीय यंत्रणेबद्दल आत्मियता वाढते. शासकीय यंत्रणेमधील दुरावा कमी होऊन जवळीक साधता येते. बचत गटामुळे महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहून भविष्यामध्ये समाजासाठी, देशासाठी काहीतरी करावे ही जाणीव निर्माण होते. तसेच कार्यात्मक साक्षरता, संभाषण कौशल्य, कार्यात्मक कौशल्याची वाढ होते. समाजातील जास्तीत जास्त महिलांनी एकत्र येवून महिला बचत गटाची निर्मिती करून या उपक्रमातून कुटूंब, समाज व राष्ट्राच्या विकास व प्रगतीला हातभार लावला आहे.

**● उपसंहार**

महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व संघटीत होतील तेव्हाच त्या सर्व क्षेत्रात आत्मविस्वासाने वावरू शकतील. खऱ्या अर्थाने त्यांचे सबलीकरण होऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होईल. स्वतःचे कुटूंब, समाज व राष्ट्राला त्या पुढे नेवू शकतील पुरूषप्रधान संस्कृतीच्या वातावरणात महिलांनी आपली सक्षमता सिध्द केली आहे. त्यामुळेच मनात आणले तर सामाजिक स्वास्थासाठी दबाव गट निर्माण करण्यासाठी महिलांना या बचत गटाचा अस्त्रासारखा वापर करता येईल. महिलांच्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी महिलांचे सबलीकरण व आर्थिक सक्षमीकरण अशी यशस्वी चळवळ बचत गटामुळे पहिल्यांदाच होत आहे. ह्याकरीता स्वयंसहायता बचत गटांना अधिक सक्षमीकरण्याची गरज आहे. स्वयंसहायता बचत गटांना बँकेला जोडणे आवश्यक आहे. सहकारी पतपेढ्या, सुक्ष्म वित्तपुरवठा करणाऱ्या संस्था यांना सक्षम करून सुक्ष्म वित्तपुरवठा क्षेत्राच्या योग्य कार्यप्रणालीसाठी कायदेशीर आणि नियामक चौकट आखणेही गरजेचे आहे. बँकिंग क्षेत्र गरिबांच्या गरजा पूर्णतः जाणून घेवू शकत नाही. त्यामुळे सुक्ष्म वित्तपुरवठा क्षेत्राला चालना द्यायला हवी. ग्रामीण भागात आजही सावकारांचे अस्तित्व असल्यामुळे गरीब महिलांचे शोषण होवू नये याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**● संदर्भग्रंथ सुची**

१. कराडे प्रा. जगन - जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने.
२. काटोले रविंद्र म. - महिला बचतगट (स्वयंसहायता बचतगट मार्गदर्शिका)
३. गोस्वामी सुबुध्दी - महिला एवं बालविकास
४. मुलानी प्रा. एम. यु. - महिला स्वयंसहायता बचत गट, डायमंड पब्लीकेशन पुणे.
५. मुलानी प्रा. एम. यु. - अल्पबचत नियोजन (बचतगट), डायमंड पब्लीकेशन